राष्ट्रोध्दाराय तंत्र शिक्षणम्

दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४
Email ID: ropune@dtemaharashtra.gov.in
Web: www.ropune.org.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन
# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
## ४१२, ई, शिवाजीनगर, पुणे-४११ ०१६.

**कालमर्यादा २८/०६/२०२२**

जा.क्रं.विकापु/आस्था-१/२०२२/ 2923 दिनांक : 23 JUN 2022

प्रति,

संचालक/ प्राचार्य/उपसचिव
सर्व शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालये/औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालये /
शासकीय तंत्रनिकेतने व तत्सम संस्था/.महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण परीक्षा मंडळ विभागीय कार्यालय, पुणे

विषयः-अनाधिकृतपणे गैरहजर राहणा-या शासकीय कर्मचा-यांविरुद्ध कार्यवाही करण्याबाबतच्या सुचना

संदर्भ :- मा.संचालक,तंत्रशिक्षण संचालनालय,मुंबई यांचा यांचे पत्र क्र.४अ/आस्था/२०२२/३०५
दिनांक १३/०६/२०२२

उपरोक्त संदर्भिय पत्राचे अवलोकन करावे. वित्त विभागाच्या शासन निर्णय क्र.अरजा-२०१६/प्र.क्र.८४/सेवा-६ दिनांक १०/१०/२०१७ अन्वये अनाधिकृतपणे गैरहजर राहणा-या शासकीय कर्मचा-यांविरुद्ध कार्यवाही करण्याच्या सुचना दिलेल्या आहेत. सबब सहा महिन्यांपेक्षा जास्त कालावधीसाठी विनापरवानगी गैरहजर असलेल्या वर्ग १ व वर्ग २ अधिका-यांची माहिती या कार्यालयांस **विवरणपत्र अ** मध्ये तसेच सद्यस्थितीत विनापरवानगी रजेवर गेलेले व सध्या संस्थेत रुजू झालेले परंतु त्यांचे रजा मंजूरचे प्रस्ताव प्रलंबित असलेल्या प्रकरणांची माहिती **विवरणपत्र ब** मध्ये भरुन आवश्यक त्या सर्व सहपत्रांसह या कार्यालयांस दिनांक २८/०६/२०२२ पुर्वी सादर करावी.

तसेच यानंतर संस्थेतील सहा महिन्यांपेक्षा अधिक कालावधीसाठी अनुपस्थित असलेल्या वर्ग १ व २ अधिकारी यांचा अहवाल **प्रत्येक जानेवारी व जुलै महिन्याच्या पहिल्या आठवडयात विवरणपत्र क आवश्यक सहपत्रांसह या कार्यालयांस व्दिप्रतीत सादर करावा** , जेणेकरुन या कार्यालयामार्फत योग्य ती कार्यवाही करुन अहवाल संचालनालयांस विहीत कालावधीत सादर करणे शक्य होईल. सदर माहितीसाठी या कार्यालय स्तरावर दर सहा महिन्यांनी स्वतंत्र परिपत्रक/पत्र निर्गमित करण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी. संस्थेची सदर माहिती निरंक असल्यास तसे लेखी कळविण्यात यावे.

तसेच आपणांस कळविणेत येते की, वर्ग ३ व वर्ग ४ च्या कर्मचा-यांची माहितीही उपरोक्त सुचनांनुसार या कार्यालयांस **स्वतंत्र** सादर करण्यात यावी.

उपरोक्त विवरणपत्रे तयार करतांना ती सकल मराठी फॉन्ट,एक्सेल शिट मध्ये तयार करण्यात यावीत.

Endorsement

**विवरणपत्र अ**

| अ क्र | अधिकारी /कर्मचारी नाव /कार्यालयाचे नांव | पदनाम | केव्हापासून अनुपस्थित आहेत | यांच्याविरुद्ध केलेली कार्यवाही | शिस्तभंगाची कार्यवाही केली का,असल्यास सद्यस्थिती | प्रकरणपरत्वे वैद्यकीय मंडळासमोर हजर केले आहे का,नसल्यास कारणे | शिस्तभंगाची कार्यवाही केली नसल्यास /वैद्यकीय मंडळासमोर हजर केले नसल्यास कारणे | रजा समर्थनिय नसल्यास व रकाना क्र.६ व ७ प्रमाणे कार्यवाही केली नसल्यास त्याबाबत संबंधितांवर जबाबदारी निश्चित केली का, नसल्यास कारणे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | ०२ | ०३ | ०४ | ०५ | ०६ | ०७ | ०८ | ०९ |

**विवरणपत्र ब**

| अ.क्र. | अधिकारी / कर्मचारी नांव,पदनाम, कार्यरत संस्था | केव्हापासून विनापरवानगी अनुपस्थित आहेत | रजेच्या प्रस्तावाबाबतची सद्यस्थिती |
|---|---|---|---|
| ०१ | ०२ | ०३ | ०४ |

**विवरणपत्र क**

| अ.क्र. | अधिकारी / कर्मचारी नांव,पदनाम, कार्यरत संस्था | केव्हापासून विनापरवानगी अनुपस्थित आहेत | संस्थास्तरावर केलेली कार्यवाही |
|---|---|---|---|
| ०१ | ०२ | ०३ | ०४ |

(मा.रा.जाधव)
प्र.सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय पुणे

प्रत- संगणक विभाग यांना संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यासाठी.

Endorsement

महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४७३/४२४/४३४
ई-मेल—desk४a@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट: http//www.dtemaharashtra.gov.in

क्रमांक: ४अ/आस्था/२०२२/३०५ दिनांक: 03 JUN 2022

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय पुणे.
20 JUN 2022
आवक क्र. 5746

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
अमरावती, औरंगाबाद, मुंबई, नागपूर, नाशिक, पुणे.

**विषय** : अनधिकृतपणे गैरहजर राहणा-या शासकीय कर्मचा-यांविरुद्ध कार्यवाही करण्याबाबतच्या सुचना
**संदर्भ** : वित्त विभाग, महाराष्ट्र शासन, परिपत्रक क्रमांक अरजा-२०१६/प्र.क्र.८४/सेवा-६ दिनांक १०/१०/२०१७

तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिनस्त शासकीय तंत्रनिकेतने व तत्सम संस्थांमधील काही अध्यापकांच्या दीर्घकालीन रजेचे प्रस्ताव शासन मान्यता प्राप्त करण्याकरिता संचालनालयास सादर करण्यात येतात.

सदर प्रस्तावांबाबत असे निदर्शनास आले आहे की, दीर्घकालीन रजेचे प्रस्ताव रजा संपुष्टात आल्यावर संबंधित कर्मचारी रुजू झाल्यानंतर विलंबाने फक्त कार्योत्तर मंजूरीसाठी संचालनालयास सादर करण्यात येतात. अशा कर्मचा-यांच्या दीर्घकालीन रजेबाबतची माहिती विहित वेळेत शासनाच्या निदर्शनास आणण्यात येत नाही. अध्यापकांच्या वारंवार, दीर्घकाळ अनुपस्थितीमुळे कार्यालयीन शिस्तीवर, कामकाजावर प्रतिकूल परिणाम होतो. अशा कर्मचा-यांवर वेळीच कारवाई न केल्यामुळे अन्य कर्मचा-यांमध्ये चुकीचा संदेश जातो. त्यामुळे विनापरवानगी रजा घेण्याची प्रवृत्ती वाढत जाण्याची शक्यता असते.

यासंदर्भात वित्त विभागाच्या संदर्भाधीन शासन निर्णयान्वये अनधिकृतपणे गैरहजर राहणा-या शासकीय कर्मचा-यांविरुद्ध कार्यवाही करण्याच्या सुचना दिल्या आहेत. सद्यस्थितीत शासकीय तंत्रनिकेतने व तत्सम संस्थांमधील विनापरवानगी अनुपस्थिती/दीर्घकालीन रजेवर असणा-या शासकीय कर्मचा-यांची माहिती वित्त विभाग, शासन निर्णय १०/१०/२०१७ मधील परि.३ मध्ये नमूद विवरणपत्रात भरुन तातडीने सादर करण्यात यावी. तसेच परि.३ मधील निर्देशानुसार ६ महिन्यांपेक्षा अधिक कालावधीसाठी अनुपस्थित असलेल्या अध्यापकांचा प्रत्येक जानेवारी व जुलै महिन्याच्या पहिल्या आठवडयात आढावा घेऊन दर सहामाही अहवाल सादर करण्यात यावा. सदर शासन निर्णयानुसार विनापरवानगी अनुपस्थित कर्मचा-यांवर उचित कार्यवाही करण्यात यावी. तसेच सद्यस्थितीत विनापरवानगी रजेवर गेलेले व सध्या संस्थेत रुजू झालेले परंतु त्यांचे रजा मंजूरीचे प्रस्ताव प्रलंबित असलेल्या प्रकरणांची माहितीही संचालनालयास सादर करण्यात यावी.

(प्रमोद नाईक)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.